# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### निफाड (जि. नाशिक) येथील पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागाची विविध पदे रिक्त असल्याबाबत

**(१) ३८३४५ (०१-०४-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि. नाशिक) येथील पंचायत समिती स्तरावरील शिक्षण विभागाची एकूण ११०९ मंजूर पदांपैकी १३६ पदे रिक्त असून त्यामधील गटशिक्षणाधिकारी १ पद, विस्तार अधिकारी ४ पदे, केंद्र प्रमुख २० पदे, वरिष्ठ सहाय्यक १ पद, कनिष्ठ सहाय्यक ३ पदे, मुख्याध्यापक २८ पदे, पदवीधर शिक्षक ३६ पदे, उपशिक्षक ४४ पदे अशी विविध पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०४-०३-२०२४) :** (१) हे,अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत सरळसेवा/ पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्हयातील मुळवा जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ४०१७५ (०९-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील मुळवा जिल्हा परिषदेच्या एकमेव मुलींची स्वतंत्र शाळा असलेल्या शाळेत सात शिक्षकांची आवश्यकता असतांना सद्यःस्थितीत फक्त चार शिक्षक असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३)** (१) व (२) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील मंजूर उड्डाणपूलांची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३) ४६०१५ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील मंजूर उड्डाण पुलांच्या भूसंपादनासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होत नसल्याने या पूलांच काम प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध भागातील रस्ते तसेच काही उड्डाणपूल व रेल्वे क्राँसिंगवरील पुलांची मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी केंद्र सरकारकडे केली याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे काय,

(३) असल्यास, शहरातील आसरा येथील रेल्वे पुलांचे रुंदीकरण आणि अक्कलकोट, पंढरपूर, तुळजापूर, सोलापूर आणि गाणगापूर ही तीर्थक्षेत्र रिंगरुट मार्गे जोडण्याची मागणी त्याचबरोबर वडकबाळ येथील नदीवर बंधाऱ्यांचे कामे बॅरेजस पुल बांधावा अशा मागण्या केल्या आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, शहरातील पुलाच्या भूसंपादनासाठीचा निधी आणि इतर सर्व मागण्यांच्या अनुषंगाने राज्य शासनाने पाठपुरावा केला आहे काय वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०२-२०२४) : (**१) सोलापूर जिल्हयातील मंजूर उड्डाणपुलासाठी आवश्यक असणारे भूसंपादन महानगर पालिका, सोलापूर यांचेमार्फत चालू आहे. नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७.१०.२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उड्डाणपुलासाठी ७० टक्के निधी हे राज्य शासन व ३० टक्के निधी स्थानिक स्वराज्य संस्था /महानगरपालिका, सोलापूर यांनी उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. भूसंपादनासाठी एकूण २९९.०१ कोटी निधी आवश्यक असून राज्य शासनाने भूसंपादन प्रक्रियेसाठी रु.४१ कोटी रक्कम सोलापूर महानगरपालिकेकडे वर्ग केली आहे. भूसंपादनासाठी सोलापूर महानगर पालिकेला ३० टक्के निधीनुसार रु.८९.७० कोटी निधी देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथवावर असून जुना पुना नाका ते पत्रकार भवन या उड्डाणपुलाच्या भूसंपादनाच्या अनुषंगाने एकूण ८ निवाडयापैकी ३ निवाडयांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित ५ निवाडयाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर जमीनीचा ताबा महानगर पालिकेकडून मिळाल्यानंतर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात येईल.

(२) माढा तालुक्यातील कुर्डूवाडी शहरातील रेल्वे क्रॉसिंग ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली आहे.

(३) सोलापूर महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील आसरा चौक येथील रेल्वे पुलाचे रुंदीकरणाचे कामास केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत तत्वत: मान्यता मिळाली आहे.

सोलापूर-विजयपूर २१ कि.मी. चे बाहयवळण म्हणजेच हत्तुर ते बाळे या बाहयवळणाचे काम पूर्ण झालेले आहे व वाहतूक सुरळीत चालू आहे. त्याचा पुढील भाग म्हणून रिंग रुट प्रस्तावित असून त्यासाठी भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

वडकबाळ येथील नदीवर ब्रिज कम बंधारा पुलाचे बांधकाम उद्योजकामार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) सोलापूर शहरातील उड्डाणपुलाच्या अनुषंगाने भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे व इतर मार्गाच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे नमूद कार्यवाही प्रगतीत आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागातील रिक्त पदांबाबत

**(४) ४९७५८ (१८-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आठही पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी हे मुख्य पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरावर अधिक्षक, विस्तार अधिकारी वर्ग-१, वर्ग-२, केंद्रप्रमुख, पदवीधर, उपशिक्षक, लिपिक व अन्य अशी मिळून जवळपास ७०९ पदे गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यादृष्टीने सदर सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०४-०३-२०२४) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत सरळसेवेने पदभरती तसेच पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(५) ६२४२८ (२५-०४-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावास अल्पसंख्यांक विकास विभागाने मंजूरी दिल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या इमारतीच्या बांधकामासाठी चोपडा शहरातील गट क्र.२८८ ही जागा माहे मार्च, २०१८ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी हस्तांतरीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून अद्याप उक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,अल्पसंख्यांक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी इमारतीचे बांधकाम करण्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-१२-२०२३) :**(१), (२) व (३) होय.

दि. ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये केंद्र व राज्य हिश्श्यातील पहिल्या हप्त्यातील रू. २५२.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला होता.

तथापि, मा.प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्या समवेत मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्या सोबत दि. १३.०१.२०१७ रोजी झालेल्या योजनेच्या आढावा बैठकीत उपरोक्त कामात बदल

करून नवीन ITI संस्थेऐवजी विद्यमान ITI मध्ये अतिरिक्त तुकडीवाढ़ करण्याची सुचना मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांनी दिल्याप्रमाणे कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून तुकडीवाढ करून क्षमता वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यामळे यापुर्वी दि. ३१ मार्च, २०१६ च्या शा.नि. अन्वये वितरीत केलेला निधी शासन खाती जमा करण्यात आला आहे.
(४) होय.
(५) मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजगता विभाग यांनी दि. १३.०१.२०१७ रोजी झालेल्या योजनेच्या आढावा बैठकीत दिलेल्या सुचनेप्रमाणे जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा प्रस्ताव रद्द करून त्याऐवजी विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून अतिरिक्त तुकडीवाढ करून क्षमता वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील अल्पसंख्याक कल्याण समितीच्या मान्यता घेऊन अंतिम मंजुरीसीठी केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.

---

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील प्रलंबित आसलेली कामे पुर्ण करुन सदर महामार्गावर रुग्णालये व इतर सोयीसुविधा पुरविणेबाबत

**(६) ६५१०८ (३०-०८-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे काम गेली १२ वर्षे प्रलंबित असल्याने निकृष्ट दर्जाच्या रस्त्यावर असंख्य खड्डे पडून गत १२ वर्षात सुमारे ३७०० अपघात होऊन त्यामध्ये ५६७ नागरीकांनी प्राण गमाविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे सिंधुदुर्ग जिल्हा हद्दीतील अनेक ठिकाणी अर्धवट लेन, सर्व्हिस रोड, स्ट्रीट लाईटची गैरसोय, जागोजागी डिव्हायडर तोडलेले इत्यादी अर्धवट कामांमुळे अनेक अपघात घडत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हा हद्दीत अनेक ठिकाणी अर्धवट कामे झालेली असतांनाही संबंधित ठेकेदाराकडून सिंधुदुर्गात महामार्ग चौपदरीकरणाचे ९५ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महामार्गावर वाढते अपघात रोखण्यासाठी प्रत्येक ५० किंवा १०० कि.मी. अंतरावर ट्रामा सेंटर तसेच पनवेल ते पोलादपूर या टप्प्यात किंवा तळकोकणात अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त महामार्ग प्रकल्पाचे विकास काम शासकीय विलंबामुळे १२ वर्षे इतक्या प्रदिर्घ कालावधीपर्यंत प्रलंबित असून अद्यापही पूर्ण झाले नसल्याने रुपये ९४२ कोटीचा प्रकल्पाचा खर्च रुपये २००० कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकल्पाचे विकासकाम १२ वर्षे प्रलंबित राहण्याबाबत शासनाने चौकशी करुन महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी तसेच महामार्गावर होत असलेल्या अपघातांची व मृत्युंची संख्या विचारात घेता, ते रोखण्यासाठी आणि अपघातग्रस्तांना तात्काळ उपचार मिळण्याकरिता ट्रामा सेंटर उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, उक्त महामार्गाचे विकास काम १२ वर्षे प्रलंबित ठेवणे व महामार्गावरील रुग्णालये व इतर सोयीसुविधा पुरविण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध तसेच सदर रस्त्याचे काम अर्धवट करणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०३-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील पनवेल ते इंदापूर कि.मी.०/०० ते कि.मी.८४/०० ही लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व इंदापूर ते झाराप कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७० ही लांबी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अखत्यारित येते.

मुंबई-गोवा महामार्गाच्या प्रारुप आराखडयास केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून जून २०१३ मध्ये मंजूरी देण्यात आली असून चौपदरीकरणाचे प्रत्यक्ष कामाला नोव्हेंबर २०१७ मध्ये सुरुवात झाली आहे. गृह विभागाच्या अहवालानुसार सदर महामार्गावर सन २०१३ ते माहे ऑक्टोबर-२०२३ अखेर पर्यत एकूण १६८५ प्राणांतिक अपघात घडले असून २०१० व्यक्ती मृत्यूमुखी पडले आहेत. परंतु हे सर्व अपघात केवळ निकृष्ट दर्जाचा रस्ता व खड्डे यामुळे झालेले आहेत, हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील अपघात हे केवळ अपूर्ण लेन, सर्विस रोड, स्ट्रीट लाई गैरसोय इत्यादिमुळेच होत नसून स्थानिकांनी अनधिकृतपणे ठिकठिकाणी डिव्हायडर तोडल्यामुळे देखील होत आहेत.

(३) सिंधुदूर्ग जिल्हयातील प्रलंबित भूसंपादन बाबींमुळे अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यात आलेली असून ९९ टक्के काम पूर्ण झालेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) महामार्गामधील पनवेल ते इंदापूर या लांबीच्या कामाचा खर्च ९४२ कोटी वरुन २००० कोटीपर्यत वाढल्याची बाब खरी आहे.

(६) महामार्गाच्या एकूण ४३९ कि.मी. लांबीपैकी ३२५ कि.मी. लांबीमधील काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित लांबीमधील काम प्रगतीपथावर आहे. चौपदरीकरणासाठी आवश्यक भूसंपादन, वन जमीनीची परवानगी, कोविड-१९ इत्यादी कारणामुळे सदर कामास विलंब झालेला आहे. महामार्गावर होत असलेले अपघात ग्रस्तांना तात्काळ मदत मिळण्याच्या दृष्टीने इंदापूर-माणगांव, पोलादपूर-महाड, संगमेश्वर-चिपळूण, कणकवली, ओरस इत्यादी महत्वाच्या स्थळी महामार्गावर ठिकठिकाणी ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तित्वात आहेत. तसेच पनवेल ते इंदापूर या रस्त्यावर ट्रॉमा सेंटर उभारण्यासाठीचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत तयार करण्यात येत आहे.

(७) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारितील मुंबई-गोवा महामार्गाच्या पनवेल ते इंदापूर चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणांतर्गत देण्यात आलेल्या कंत्राटदाराने विहित मुदतीमध्ये काम पूर्ण न केल्याने त्याना टर्मिनेट करण्यात आलेले आहे.

इंदापूर ते वडपाले माणगांव या रस्त्याचे कामास झालेल्या विलंबामुळे संबंधित ठेकेदारास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून नियमानुसार दंड वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेकडे सादर केलेला आहे. तसेच आरवली ते कांटे, कांटे ते वाकेड या कामास झालेल्या विलंबामुळे कंत्राटदाराकडून नियमानुसार दंड वसुल करण्यात आलेला आहे.

---

### मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कामथे हरेकरवाडी येथील खाजगी जागेत अतिक्रमण केल्याबाबत

**७) ६५४८५ (३०-०८-२०२३). :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कामथे-हरेकरवाडी येथे खाजगी जागेत अतिक्रमण करून भिंत बांधली असल्याच्या विरोधात सा. बां. व महसूल विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही त्यांची दखल घेतली नसल्याने श्री. नयनेश दळी यांनी दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास रास्ता रोको केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस निरीक्षक रविंद्र शिंदे व सह पोलीस निरीक्षक राठोड यांचा या बाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय तसेच राष्ट्रीय महामार्गाचे कनिष्ठ अभियंता श्याम खुणेकर यांनी तसेच त्यांच्या वरिष्ठांनी याबाबत केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

या महामार्गावरील वाहतुकीच्या व रहदारीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कामथे हरेकरवाडीमध्ये उजव्या बाजूस चौपदरीकरण कामांतर्गत संरक्षक भिंतीचे काम महामार्गाच्या भूसंपादीत जागेमध्ये करण्यात आलेले आहे. तथापि, सदर काम सुरु असताना श्री. नयनेश दळी यांनी सदर संरक्षक भिंतीचे काम करु नये याकरीता क्षेत्रीय स्तरावर विरोध करुन महामार्गावर स्वत: झोपून रस्ता रोको केला ही वस्तुस्थिती आहे.
(२) या महामार्गावर रास्ता रोको केल्याबाबत तसेच शासकीय कामामध्ये अडथळा आणल्याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत श्री.नयनेश दळी यांचेवर विहीत नियमानुसार गुन्हा दाखल करणेत आला आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने चिपळूण पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी श्री.नयनेश दळी यांच्या विरुध्द दिनांक १२.८.२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोपत्र पाठविण्यात आले आहे.
(३) तपासाअंती श्री.नयनेश भालचंद्र दळी यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-सातारा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(८) ६५९०९ (३१-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा रस्त्याचे काम सन २०१० मध्ये बी.ओ.टी. तत्त्वावर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला देण्यात आले असून गत दहा वर्षात सहा वेळा मुदतवाढ देवूनही अद्याप या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टोल संदर्भातील नियमावलीनुसार सदर रस्त्याचे काम पुर्ण केले नसताना तसेच गत दहा वर्षात सहा वेळा मुदतवाढ देताना बेकायदेशीर टोल वसुली केली जात असल्याबाबत शासनाकडून कोणतेही आक्षेप का नोंदविण्यात आले नाही,
(३) असल्यास, रिलायन्स इन्फ्रा सोबत सन २०१० साली काम सुरू करताना जो करार करण्यात आला होता त्या करारात नमूद केलेल्या प्रमुख अटी व शर्ती कोणत्या होत्या, मूळ करारानुसार त्यावेळी या रस्त्याची किंमत किती होती,
(४) असल्यास, सदर कंपनीला किती वर्षाकिरता हा रस्ता बी.ओ.टी. तत्त्वावर देण्यात आला आहे त्यानुसार आतापर्यंत कंपनीकडून किती टोल वसूल करण्यात आला आहे तसेच गत दहा वर्षापासून काम प्रलंबित असताना सदर कंपनीला मुदतवाढ देण्यात येणार आहे काय, असल्यास सदर मुदतवाढ देताना कंपनीने केलेले काम व टोलवसुली याचा हिशोब करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग व मुंबई-बेंगळूरू महामार्गावरील रस्त्यांची कामे प्रलंबित असतांना टोलमध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून मोठी वाढ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रश्न भाग २, ३ व ४ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुणे-सातारा मार्गाचे कंपनीने केलेले काम व टोल वसुलीबाबत निर्णय घेणे तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग व मुंबई-बेंगळूरू महामार्गावरील रस्त्यांची कामे प्रलंबित असतांना टोलच्या दरात केलेली वाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०२-२०२४) :** (१) पुणे-सातारा महामार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे आहे.

पुणे-सातारा रस्त्याचे काम रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर यांना सन २०१० मध्ये बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आले असून या कंपनीला गत १० वर्षात सहा वेळा मुदतवाढ देऊनही अदयाप या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्याची बाब खरी आहे.

सद्यस्थितीत पुणे-सातारा महामार्गाचे करारनाम्यातील एकूण १४०.३५ कि.मी. लांबीपैकी १३७.७१ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरित २.६४ कि.मी.लांबीतील कामामधील विविध अडचणीमुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सद्यस्थितीत पुणे-सातारा महामार्गाचे बहुतांशी काम दिनांक ३०.०४.२०२२ रोजी पूर्ण झाले आहे.
(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व उद्योजक यांच्या झालेल्या दिनांक १०.३.२०१० रोजीच्या करारानुसार पथकर नाके निश्चित करुन दिनांक ५.१२.२००८ व दिनांक २६.०८.२०१० रोजीच्या राष्ट्रीय महामार्गाच्या अधिसूचनेनुसार पथकर आकारणी केली जात आहे.
(३) मूळ करारानुसार १४०.३५ कि.मी. लांबीच्या ६ पदरीकरणाच्या कामाच्या प्रकल्पाची किंमत रु.१७२४.५५ कोटी एवढी होती. सवलत करारानुसार सवलत कालावधी २४ वर्षे एवढा असून माहे ऑक्टोबर २०१० मध्ये कार्यादेश देण्यात आला होता.
(४) सदर कंपनीला सन २०१० ते सन २०३४ या २४ वर्षाच्या कालावधीकरिता रस्ता बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आला असून टोल वसूलीसाठी सवलतदारास मुदतवाढ दिलेली नाही. सप्टेंबर २०२३ अखेर कंपनीकडून रु.३११४.०२ कोटी टोल वसूल करण्यात आला आहे. उदयोजकास काम पूर्ण करण्याचा कालावधी वाढवून देण्यात आला असून पथकर वसूलीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली नाही.
(५) मुंबई-बेंगलूर महामार्गावरील (पुणे ते सातारा ) पथकर वसूली राष्ट्रीय महामार्ग अधिसूचना दिनांक ०५.१२.२००८ व दिनांक २६.०८.२०१० नुसार करण्यात येते. दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-पुणे जुना महामार्ग यांच्या पथकरामध्ये दिनांक १.४.२०२३ पासून वाढ करण्यात आली आहे. सदर पथकरातील वाढ महाराष्ट्र शासन, अधिसूचना माहे ऑगस्ट २००४ व केंद्र शासन अधिसूचना माहे सप्टेंबर २००६ अन्वये निश्चित करण्यात येते.
(६) टोलवसुली शासनाने विहित केलेल्या नियमाप्रमाणे असल्यामुळे टोलच्या दरात केलेली वाढ मागे घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(९) ६६८३६ (३१-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहर हद्दीतील अनेक रस्ते आणि महामार्गाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे, नाल्याची कामे सुरु असणे, रस्ता खोदलेला असणे यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून मणक्यांच्या आजारासह विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन परभणी शहर हद्दीतील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) परभणी शहर हद्दीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता दिनांक १६/०२/२०२४ रोजी रक्कम रु.६२ कोटी च्या कामाकरिता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले असुन सदरची कामे फेबुवारी, २०२५ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

---

## मलकापूर-बुलढाणा-चिखली (जि.बुलढाणा) रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ चे कॉंक्रिटीकरण व चौपदरीकरण करण्याबाबत

**(१०) ६८७८३ (३०-०८-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर-बुलढाणा-चिखली (जि.बुलढाणा) रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ चे कॉंक्रिटीकरण व चौपदरीकरण करण्याबाबतचे निवेदन मलकापूर विधानसभा लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने मलकापूर-बुलढाणा-चिखली रस्त्याचे चौपदरीकरण व कॉंक्रिटीकरण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मलकापूर -बुलढाणा -चिखली -जालना-औरंगाबाद रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ ए म्हणून दि.०५.०३.२०२४ रोजी घोषित झाला आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी १५१.५३ किमी असुन त्यापैकी ७१.६७ किमी लांबी सा.बां.विभागाच्या अखत्यारीत येते.
सदर लांबीतील कामे खाजगीकरणांतर्गत ‘बांधा, वापरा व हस्तांतरित करा (BOT)’ तत्त्वावर पुर्ण करण्यात आली असून त्यानुषंगाने सदर रस्त्यावरील दाताळा (किमी ९/००) व येळगाव (किमी ५४/००) येथे उद्योजकाकडून पथकर वसूली सुरू आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचा सवलत कालावधी हा दि.१४.१०.२०३४ रोजी संपुष्टात येणार आहे.
सद्यस्थितीत सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचा व्यावहारिकता अहवाल राष्ट्रीय महामार्ग, अकोला या विभागाकडून तयार करण्याचे काम सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील चार महसुली विभागांमध्ये ‘पुस्तकांचे गाव’ या योजनेचा विस्तार करण्याबाबत

**(११) ६८८७८ (२८-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चार महसुली विभागांमध्ये ‘पुस्तकांचे गाव’ या योजनेचा विस्तार करण्यासंदर्भात मान्यता दिलेली असताना दिनांक २५ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयानुसार अद्याप पर्यंत ही योजना सुरूच झाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात पाहणीचा अहवाल व निधी प्राप्त झाला नसल्यामुळे योजनेला विलंब होत असल्याचे

निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना चार महसुली विभागांमध्ये प्रभावीपणे राबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार व्यापक स्वरुपात सुरु करण्यासाठी दि.४.१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाचे सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पहिल्या टप्प्यात दि.२५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पहिल्या टप्प्यात पुस्तकाचे गाव विभागीय स्तरावर ६ महसुली विभागात सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालील महसुली विभागात त्या विभागांसमोर दर्शविलेल्या पुस्तकाचे गाव निश्चित करण्यात आले आहे.

| महसुली विभाग | क्षेत्र |
|---|---|
| औरंगाबाद | वेरुळ, जि.औरंगाबाद |
| नागपूर | नवेगाव बांध, जि. गोंदिया |
| कोकण | पोंभूर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग |
| पुणे | अंकलखोप (औदुंबर), ता.पलुस, जि. सांगली |

अमरावती व नाशिक या महसुली विभागात पुस्तकाचे गाव सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर ६ महसुली विभागापैकी ४ विभागातील गावामधील दालनाकरिता रु.२० लाख इतके अनुदान विभागाच्या दि.३१.०३.२०२२ च्या ज्ञापनान्वये राज्य मराठी संस्थेस उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राज्य मराठी विकास संस्थेने सदर ४ महसुली विभागांना भेट देऊन त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

त्यापैकी कोकण विभागातील पोंभुर्ले, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील दालन सुरु करण्यात आले असून उर्वरीत १) वेरुळ,ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद २) नवेगाव बांध, ता.अर्जुनी-मोरगाव, जि.गोंदिया, ३) अंकलखोप, पुणे ही ३ दालने देखील लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

---

## गारगाव, परळी व देवळी (ता. वाडा, जि. पालघर) विभागातील विविध विकास कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१२) ६९८९३ (३१-०८-२०२३). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गारगाव, परळी व देवळी (तालुका वाडा, जिल्हा पालघर) विभागातील विविध रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याबाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला असता तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सदर कामांची चौकशी सुरू असून चौकशी करून झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे उत्तर सभागृहात दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबतीत कोणकोणत्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०३-२०२४) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी अनियमिततेच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांविरुध्द दि.७.११.२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील अन्नधान्य वितरण कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) ७१६१२ (०३-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील अन्नधान्य वितरण कार्यालयात एकूण ११ परिमंडळ कार्यालये व फुरसुंगी गोदाम कार्यरत असून सदर कार्यालयांसाठी एकत्रित आकृतीबंधातील सन २००३ च्या शासन निर्णयानुसार १४५ पदे, सन २०२२ च्या शासन निर्णयानुसार ५९ पदे व वाढीव पदसंख्येनुसार प्रस्तावित ९४ पदे मंजूर केली असून अतिरिक्त ३५ पदे तातडीने भरणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलीपात्र पुरवठा निरिक्षण अधिकारी / परिमंडळ अधिकारी व पुरवठा निरिक्षक यांचे बदलीने रिक्त होणाऱ्या जागाही त्वरित भरण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, पुणे येथे सद्य:स्थितीतील कामकाज करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व कामकाजात सुरळीतता राहण्याच्यादृष्टीने बदलीने रिक्त झालेली पदे भरणेबाबत तसेच सुधारित आकृतीबंधाकरिता शासन आदेश निर्गमित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी व त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील अन्नधान्य वितरण कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०५-०३-२०२४) :** (१) विभागाचा शासन निर्णय, दिनांक २६.०६.२००३ नुसार अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे करीता निर्णयानुसार १४५ पदे मंजूर होती. विभागाचा सुधारित आकृतीबंधाबाबतचा शासन निर्णय, दिनांक ०४.०७.२०२२ नुसार अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे करीता ५९ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जाहिरात क्र. ४१४/२०२३, दि.२९ डिसेंबर, २०२३ मध्ये निरीक्षण अधिकारी (पुरवठा)/परिमंडळ अधिकारी, गट-ब संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील सर्व ७६ रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

पुरवठा निरीक्षक पदोन्नती आदेश, दिनांक ५.२.२०२४ अन्वये पुणे विभागातील पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्गाच्या पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यात आल्या आहेत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३, जाहिरात क्र. ६३/२०२२, परीक्षा दिनांक व सत्र प्रसिद्धी, दि.७.२.२०२४ नुसार विभागामार्फत क्षेत्रीय पुरवठा यंत्रणेतील, संपूर्ण राज्यातील पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदरची परीक्षा दि. २६ फेब्रुवारी, २०२४ ते दि.२९ फेब्रुवारी, २०२४ दरम्यान घेण्यात आली असून सदर परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर संपूर्ण राज्यातील पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(३) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ च्या लेखी निवेदनाद्वारे याबाबत मा. मंत्री, अ.ना.पु. व ग्रा.सं. महोदय यांच्याकडे मागणी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## पनवेल (जि. रायगड) भाताण येथील अमिटी विद्यापीठातील स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१४) ७१७६० (०८-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) भाताण येथील अमिटी विद्यापीठातील स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांना कोणत्याही प्रकारची पगारवाढ अथवा इतर भत्ते मिळत नाही तसेच सदरहू कामगारांच्या अन्य प्रलंबित मागण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी एक सविस्तर निवेदन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, यांच्याकडे सादर केल्यानंतर दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास सर्व संबंधितासमवेत एक बैठक आयोजित केली होती , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीत भाताण येथील अमिटी विद्यापीठाच्या मनमानी कारभाराच्या संदर्भातील कोणकोणत्या मुद्द्यांवर विचारविनिमय होऊन कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(३) तसेच, सदरहू बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ,

(४) असल्यास, उपरोक्त बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) अमिटी विद्यापीठ, पनवेल अधिनियम, परिनियम यातील तरतुदींप्रमाणे तसेच विविध कामगार अधिनियम, नियम यामधील तरतुदीनुसार विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना मिळत असलेले वेतन, लाभ इत्यादींची तपासणी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(३) व (४) अमिटी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी, कामगार यांच्या वेतन, भत्ते व इतर सुविधा यांच्यासंदर्भात विविध अनियमितता विचारात घेऊन कामगार विभागाने न्यायालयात खटले दाखल केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील उपकेंद्रामध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबात

**(१५) ७१८१७ (२९-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील उपकेंद्रामध्ये असलेल्या गैरसोयी व समस्यांविरोधात विद्यार्थ्यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपकेंद्राच्या ठिकाणी आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे येथील उपकेंद्रामध्ये आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

विद्यार्थ्यांनी समस्यांच्या अनुषंगाने संचालक, ठाणे उपपरिसर यांची भेट घेतली होती.

(२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मदतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. तसेच वापरासाठी पाणीपुरवठा करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे उपरिसरात विद्यार्थ्यांना पोहचण्याच्या दृष्टीने त्या मार्गावर ३८ बस फेऱ्या उपलब्ध असून, अधिकच्या बसफेऱ्या वाढविण्यासाठी महानगर पालिका परिवहन विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील शिधापत्रिका वितरण कार्यालयात हस्तक्षेप करणाऱ्या दलालांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) ७१८६५ (१३-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शिधापत्रिका वितरण कार्यालयाच्या कामकाजामध्ये दलालांचा हस्तक्षेप वाढत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दलालांच्या माध्यमातून वितरण कार्यालयातील कर्मचारी हे नागरिकांकडून नवीन शिधापत्रिका देणे, दुरुस्ती व इतर किरकोळ कामांसाठी हजारो रुपये आकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अनेक नागरिक वारंवार वितरण विभागाकडे तक्रार करत असताना त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कार्यवाही करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय दि. १६.०५.२०२३ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत ई-शिधापत्रिका सुविधा निःशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानुसार शिधापत्रिकाधारकांना https://rcms.mahafood.gov.in// या वेबसाईटवर पब्लिक लॉगिनवर ऑनलाईन शिधापत्रिकेकरिता अर्ज करता येतो. ऑनलाईन ई-शिधापत्रिका कशी काढावी याबाबतच्या (SOP) कार्यपध्दतीचे फलक सर्व परिमंडळ कार्यालयामध्ये दर्शनी भागावर प्रदर्शित करणेत आले आहे. ऑनलाईन शिधापत्रिका उपरोक्त नमुद शासन निर्णयानुसार निःशुल्क दिली जाते व शिधापत्रिका कामकाज करणेकरिता शिधापत्रिकाधारकांकडून पैसे आकारले जात नाहीत. पुणे शहरात शिधापत्रिकेकरिता शुल्क आकारलेबाबत कोणतेही शिधापत्रिकाधारकांची तक्रार क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मालेगांव (ता.कळवण, जि.नाशिक) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) ७१९३७ (०१-०३-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.कळवण, जि.नाशिक) येथील कनाशी ते कळवण रस्त्यावरील शेकडो फाटा ते गोपाळखडी मार्गे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे वाढल्याने हा मार्ग झुडपांच्या विळख्यात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी वाहनधारकांकडून होत असूनही संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०४-२०२४) :** (१) व (२) सदर रस्त्याच्या लांबीत नियमित देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवळी करुन रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(३) प्रश्नांकित ४.२०० कि.मी. लांबीत रक्कम रु.४०० लक्ष चे डांबरीकरणाच्या मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम कार्यान्वित करणेचे नियोजन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करणेबाबत

**(१८) ७१९७१ (२८-०२-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांचे पॅनल उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून करण्यात आले असून केवळ तीन संस्थाची दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखापरीक्षणासाठी निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवड करण्यात आलेल्या संस्थानी अद्यापर्यंत किती महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण पूर्ण केले आहे,
(३) असल्यास, महाविद्यालयांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करताना कोणत्या बाबी निर्दशनास आल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०४-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) अद्याप लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टाकळी (ता.कूही, जि.नागपूर) येथील रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाची करमाफी रद्द करणेबाबत

**(१९) ७२३६३ (०९-०२-२०२४). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी (ता.कूही, जि.नागपूर) येथील श्री.रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठास राज्य शासनाने ११.२ एकर व ५.७५ एकर शासकीय जमीन कब्जेहक्काने देण्याबाबत दिनांक ११ जून, २०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करताना शासनाने रामदेवबाबा समितीला १० टक्के म्हणजेच रुपये १३ कोटी ५८ लाख ३५ हजार इतकी रक्कम जिल्हाधिकारी,नागपूर यांचेकडे जमा करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने जमीन हस्तांतर करताना विद्यापीठाकडून १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करावी किंवा कसे याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती स्थापन करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उप समितीने केवळ दोन दिवसांत बैठक घेऊन श्री.रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठास रुपये १३ कोटी ५८ लाख ३५ हजार इतक्या रकमेची करमाफी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने टाकळी (ता.कूही, जि.नागपूर) येथील श्री.रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठास मंजूर केलेली करमाफी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही;

तथापि, प्रस्तावित विद्यापीठास जमीन हस्तांतरीत करीत असताना प्रचलित नियमानुसार अनर्जित रक्कम वसूल करावी किंवा कसे, याबाबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्याचा निर्णय सदर मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला.
(२) अंशत: खरे आहे.

स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करताना १० टक्के अनर्जित रक्कम जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे जमा करण्यात यावी यासाठी दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.
(३) होय, हे खरे आहे.
(४) अंशत:खरे आहे.
(५) स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन होत असताना जमीनीचे हस्तांतरण होत नसल्याने १० टक्के अनर्जित रक्कम लागू होणार नसल्याने दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्याबाबत दिनांक १६ जुलै, २०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला असून या निर्णयानुसार दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यास मान्यता देण्यात आली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चर्नीरोड (मुंबई) येथे मराठी भाषा भवन केंद्र उभारण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ७२३८३ (०९-०२-२०२४). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चर्नीरोड (मुंबई) येथील मराठी भाषा भवन उभारण्याकरिता भूमीपूजन दिनांक ०२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुढी पाडव्याच्या शुभमुहुर्तावर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील अठरा महिन्यांच्या (दिड वर्ष) कालावधीत मराठी भाषा भवन खुले केले जाईल असे तत्कालीन मराठी भाषा मंत्री यांनी माध्यमांसमोर सांगितले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी भाषा मुख्य केंद्राची माहे मार्च, २०२३ पर्यंत एक विटही रचली गेली नसल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी भाषा भवन केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२३-०२-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) गिरगाव महसूली विभागातील भूखंड क्र.१७३६ येथे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

तथापि, दि.३०.११.२०२२ व दि.२४.०१.२०२३ रोजीच्या बैठकीत मराठी भाषा भवन ही इमारत अधिक आकर्षक व भव्य करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाचा भूखंड व मराठी भाषा विभागाचा भूखंड मिळून मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई अशी संयुक्त भव्य इमारत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामध्ये मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण विभाग यांची कार्यालये, प्रेक्षागृह, भाषा विषयक दालने व अन्य बाबी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

दि.१९.०४.२०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मा. मंत्रिमंडळाने शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयाची इमारत व मराठी भाषा विभागाची मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई अशी संयुक्त भव्य इमारत उभारण्याकरिता भूखंडाचे एकत्रीकरण करण्यास व त्याकरिता सादर केलेल्या सुधारीत आराखड्यांना मान्यता दिली.

तद्नंतर मा. मंत्रिमंडळाच्या दि.२९.११.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मराठी भाषा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील भूखंडाची अंशत: अदलाबदल करुन भूखंडाच्या पुढील बाजूस मराठी भाषा भवन व मागील बाजूस सावित्रीबाई फुले वसतिगृह अशा दोन स्वतंत्र इमारतीच्या बांधकाम आराखडे व अन्य बाबींना मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय, दि.१५.१२.२०२३ निर्गमित करण्यात आला आहे.

प्रकल्पाच्या बांधकाम खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक दि.१६.०२.२०२४ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीस सादर केले आहे.

(५) मराठी भाषा भवन अधिक विस्तृत, भव्य व आकर्षक करण्याकरिता आराखड्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे बांधकाम विषयक अनुषंगिक प्रक्रियाही पार पाडणे आवश्यक असल्याने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मराठी विकास संस्थेला कायमस्वरूपी कार्यालय देण्याबाबत**

**(२१) ७२४८९ (१३-०२-२०२४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेची अभिवृध्दी करण्यासाठी शासनाने दिनांक १ मे, १९९२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेमार्फत मराठीच्या विकासासाठी स्वतंत्र उपक्रम राबविले जाऊन त्याअंतर्गत चर्चासत्रे, भाषा विषयक उपक्रम, कोष व सूची वाड्मय इ. उपक्रम तसेच मराठी भाषा आणि राज्याची संस्कृतीचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करणे इत्यादी जबाबदाऱ्या संस्थेवर सोपविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मायमराठीच्या या संस्थेला कायमस्वरुपी जागा देण्यात न आल्यामुळे सध्याच्या असलेल्या संस्थेच्या कार्यालयीन जागेवर शासनाचे अन्य विभागांकडून ती जागा हस्तगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे या कार्यालयातील काही टेबल इमारतीच्या जिन्याखाली बंद असलेल्या कमी जागेत हलविण्यात आले असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मराठी विकास संस्थेसाठी कायमस्वरुपी जागा देण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०३-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग दि.३०.०४.१९९२ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेस कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, धोबीतलाव, मुंबई येथे जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला आहे.

तद्नंतर राज्य मराठी विकास संस्थेस दैनंदिन कामासाठी सदर जागा अपुरी पडत असल्याने मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.०३.०८.२०१७ रोजीच्या बैठकीत अतिरिक्त जागा उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय झाला. त्यास अनुसरुन मुख्याध्यापक, एलिफिस्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई यांनी दि.०४.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये काही अटी व शर्तीसह राज्य मराठी विकास संस्थेस एक वर्गखोली ८ महिन्यांसाठी उसनवारी तत्वावर उपलब्ध करुन दिली. सदर अतिरिक्त वर्गखोलीमध्ये कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य विकास सोसायटी व राज्य मराठी विकास संस्थेच्या काही कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली होती.

तथापि, महाराष्ट्र राज्य विकास सोसायटी या कार्यालयाची कार्यकक्षा रुंदावल्याने व सदर कार्यालयास बैठक व्यवस्था अपुरी पडत असल्याने तसेच सदर जागेचे तातडीने नुतनीकरण करावयाचे असल्याने राज्य मराठी विकास संस्थेस उपलब्ध करुन दिलेल्या अतिरिक्त वर्गखोलीमधील कार्यालय सदर इमारतीच्या तळमजल्यावर जिन्याच्या बाजूला स्थलांतरीत करण्याबाबत मुख्याध्यापक, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई यांनी दि.२८.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरुन अतिरिक्त वर्गखोलीतील राज्य मराठी विकास संस्थेची कपाटे तळमजल्यावर जिन्याशेजारी स्थलांतरीत करण्यात आली व कर्मचारी यांना संस्थेच्या मूळ कार्यालयात स्थलांतरीत करण्यात आले. सदर परिस्थितीत राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयाचा कारभार इमारतीच्या जिन्याखाली स्थलांतरित करण्याची बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

(४) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग दि.३०.०४.१९९२ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेस एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, धोबीतलाव, मुंबई येथे कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच चर्नी रोड येथील नियोजित मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई या इमारतीमध्ये मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त सर्वच कार्यालयांकरिता जागा प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील यंत्रमाग उद्योगाला चालना देण्याबाबत

**(२२) ७२६५० (०५-०३-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहराचा एकेकाळी देशाच्या यंत्रमाग उत्पादनात ४० टक्के वाटा येथील यंत्रमाग उद्योगांचा होता, तसेच यंत्रमाग उद्योगाची वार्षिक उलाढाल सुमारे दहा हजार कोटींची होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील अनेक यंत्रमाग उद्योग बंद पडत असून यंत्रमाग कामगार इतर क्षेत्राकडे जात असल्याने मजुरांअभावी यंत्रमाग उत्पादनात २० टक्के घट झाल्याचे भिवंडी महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अडचणीतून मार्ग काढण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान वस्त्रोद्योग मंत्री, यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच यंत्रमाग उद्योगाला पुन: उर्जितावस्था आणण्यासाठी शासन पातळीवर कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२९-०४-२०२४) :** (१) व (२) होय,

भिवंडी महानगरपालिकेच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवाल २०२२-२३ मध्ये भिवंडी (जि.ठाणे) शहराचा कधीकाळी देशाच्या यंत्रमाग उत्पादनात ४० टक्के वाटा असून या क्षेत्राची वार्षिक उलाढाल जवळपास दहा हजार कोटींची आहे तसेच भिवंडीची उत्पादन क्षमता अलिकडे मजुरांअभावी २० टक्क्यांनी घटली असल्याचे नमूद केले आहे.

(३) व (४) होय,

यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी दि.१९.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम)(सा.उ.) यांचे अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधींची समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने दि.१४.०२.२०२४ रोजी अहवाल मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांना सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही विभागस्तरावर सुरु आहे. तसेच राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण सन २०२३-२०२८ जाहिर केले असून सदर धोरणांतर्गत अनुज्ञेय असलेले लाभ यंत्रमाग उद्योगाला मिळणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शालेय पोषण आहार भरारी पथकाच्या कामकाजाबाबत**

**(२३) ७२६८३ (१३-०२-२०२४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने दिनांक १ जून, २००९ च्या शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार भरारी पथकाची निवड करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरारी पथकांनी अद्याप एकाही शाळेला भेट दिलेली नसून गेल्या एक वर्षभरापासून उक्त पथकाने आपला अहवालही शिक्षण विभागाकडे सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२३ ते माहे जानेवारी, २०२४ या कालावधीत जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्यामार्फत तालुकास्तरावर ७६ व जिल्हास्तरावर ८ अशा एकूण ८४ शाळांची तपासणी करण्यात आली आहे.

(३) व ( ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाषा संचनालयातील रिक्तपदांमुळे परिभाषा कोषाचे काम करण्यास दिरंगाई होत असल्याबाबत**

**(२४) ७२८३४ (१३-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व आपत्ती निवारण धोरण यासारख्या प्रकरणांचा मराठी अनुवाद दोन वर्षांपासून पूर्ण झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार वर्षांपासून सुधारित कोषांची कामे ठप्प आहेत तसेच एकही नवीन परिभाषा कोष हाती घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) तसेच, उक्त बाब १ व २ नुसार कामे न होण्याची सर्वसाधारण करणे काय आहेत,

(५) असल्यास, कामात होणारी दिरंगाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-०३-२०२४) :** (१) भाषा संचालनालयामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अहवालाचा खंड २ याचा मराठी अनुवाद पूर्ण करण्यात आला असून, दिनांक ११.१०.२०२३ रोजी सदर अनुवाद उच्च व तंत्रशिक्षण विभागास पाठविण्यात आला आहे. तसेच, आपत्ती निवारण धोरणाचा संपूर्ण अनुवाद ऑक्टोबर, २०२३ मध्ये महसूल विभागास पाठविण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) भाषा संचालनालयाने शासन व्यवहार कोश, अर्थशास्त्र परिभाषा कोश, तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश, कृषिशास्त्र परिभाषा कोश, शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोशांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम हाती घेतले असून, सदर कोशांची कामे प्रगतीपथावर आहेत.

भाषा संचालक पद भरण्यासाठी वेळोवेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठवूनही सदर पदावर सुयोग्य उमेदवार उपलब्ध होऊ शकला नाही, सबब, सदर पदाचे सेवाप्रवेश नियम सुधारण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सद्य:स्थितीत भाषा संचालक या पदाचे काम अतिरिक्त कार्यभाराने चालविण्यात येत आहे.

भाषा संचालनालयात अनुवादकांची ४२ पैकी २५ पदे रिक्त आहेत. इतरही पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तथापि, सद्य:स्थितीत उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे भाषा संचालनालयातील परिभाषा कोषाचे कामकाज सुरु आहे.

---

**राज्यातील "ब" " क" आणि "ड" दर्जाची ग्रंथालये 'दर्जा वर्ग' बदलाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(२५) ७२८६३ (०५-०३-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान प्राप्त ग्रंथालये शासनाच्या निकषानुसार सभासद संख्या, पुस्तके, वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या संख्येची अट पूर्ण करत असूनही ब, क आणि ड दर्जाची सुमारे १० हजार ९९२ ग्रंथालये दर्जा वर्ग बदलाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील बारा वर्षापासून शासनाने ग्रंथालयाचा दर्जा वर्ग न केल्याने या ग्रंथालयावर उदरनिर्वाह करणारे सुमारे २०००० ग्रंथालय कर्मचाऱ्यांना तुटपुज्या पगारावर काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाचन संस्कृतीवर विविध स्तरावरुन प्रयत्न करण्यात येत असतानाही ग्रंथालय आणि येथील कर्मचाऱ्यांना मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मागील १२ वर्षांपासून दर्जा वर्ग बदलाच्या प्रतिक्षेत असलेल्या १०,१९२ ग्रंथालयाचे बदलाचे आदेश पारित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असुन त्यामधील कर्मचारी त्या संस्थांचे कर्मचारी आहेत. ग्रंथालयांमध्ये कर्मचारी नियुक्ती व तद्नुषंगिक सर्व अधिकार संबंधीत ग्रंथालय व्यवस्थापनेचे आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदींनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांस परिरक्षण अनुदान मंजूर केले जाते. शासन निर्णय दि.२१.१२.२०२२ अन्वये ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात ६०% वाढ करण्यात आली असून ग्रंथालयाला मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानातील ५०% रक्कम वेतनासाठी खर्च केली जाते.

(३) शासनमान्य अ, ब, क, ड वर्गातील ग्रंथालयात आकृतीबंधानुसार २०५६९ ग्रंथालय कर्मचारी आहेत. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असुन त्यामधील कर्मचारी संस्थांचे कर्मचारी आहेत. ग्रंथालयांमध्ये कर्मचारी नियुक्ती व तद्अनुषंगिक सर्व अधिकार संबंधीत ग्रंथालय व्यवस्थापनेचे आहेत. यामध्ये शासन अथवा ग्रंथालय संचालनालयाचा प्रत्यक्ष सहभाग नसतो.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींमध्ये एकसूत्रता येण्याकरीता शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांस सेवाविषयक सवलती व सुविधांविषयक मार्गदर्शक तत्वे लागू करण्याबाबत शासनाने दि.१२.१०.२०११ अन्वये सूचित केले होते. त्यानुसार ग्रंथालय संचालनालयाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांस सेवाविषयक सवलती व सुविधांविषयक मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबतही अनौपचारिकरित्या या मार्गदर्शक तत्वाबाबत चर्चा करुन परिपत्रकाच्या प्रारुपास शासनाच्या मान्यतेने शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांस सेवाविषयक सवलती व सुविधांविषयक मार्गदर्शक तत्वे/सूचना संचालनालयाचे दिनांक ०८.०५.२०१३ रोजीचे परिपत्रक निर्गमीत केले आहे.

(४) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २१.०२.२०१२ दि.२२.०३.२०१३ आणि दि.०७.०६.२०१४ अन्वये सन २०१२-१३ पासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जा/वर्ग वाढ देणे ही प्रक्रिया स्थगित असून महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० मधील निकषांमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याची बाब ग्रंथालय संचालनालयाकडून तपासली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयांचे लेखापरिक्षक पॅनलची नियुक्ती करणेबाबत

**(२६) ७२८७६ (१३-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयाचे दर तीन वर्षांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची तरतूद असून सनदी लेखापालांचे पॅनल उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून तयार करण्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॅनलसाठी इच्छुक असणाऱ्या संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवड प्रक्रिया होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०२-२०२४) :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विद्यापीठाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरीक्षक पॅनलची निवड करण्यासाठी उच्च शिक्षण, संचालनालय यांनी दि.०२.०६.२०२३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केली होती. त्याअनुषंगाने एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. LI/HI/ निविदाधारक निश्चित करणे याकरीता संचालनालयाच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर केला होता. सदर अहवालानुसार दि.११.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तीन लेखापरीक्षकांच्या पॅनेलला मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात महाविद्यालयांमध्ये फार्मसीच्या रिक्त जागांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(२७) ७२९९३ (१४-०२-२०२४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डी. फार्मसी व बी. फार्मसी च्या नव्याने सुरु झालेल्या महाविद्यालयांमुळे फार्मसीच्या रिक्त जागांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाढलेल्या फार्मसी महाविद्यालयांच्या संख्येमुळे शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेवर परिणाम निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावांची पूर्ण तपासणी न करताच या महाविद्यालयांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१८-०३-२०२४) :**

(१) होय, हे खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यातील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या एकूण ४८२१ जागा रिक्त राहिल्या होत्या.

त्या तुलनेत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण २१८४० एवढ्या जागा रिक्त राहिल्या आहेत.

(२) (३) व (४) औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था सुरू करण्यासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, (पीसीआय) नवी दिल्ली यांचेकडून मान्यता प्रदान केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यात रिक्त राहिलेल्या जागांच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची गुणवत्ता टिकवून ठेवणे

तसेच, रिक्त जागांची संख्या कमी करण्याकरिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, (पीसीआय) नवी दिल्ली यांना सर्व समावेशक बृहत आराखडा तयार करण्याची तसेच बृहत आराखड्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना मान्यता न देण्याची तसेच सध्या कार्यरत असलेल्या संस्थांची प्रवेश क्षमता वाढ किंवा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता न देण्याची विनंती राज्य शासनाच्या वतीने करण्यात आली आहे.

त्यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या “मध्यान्ह भोजन” योजनेबाबत

**(२८) ७३०२५ (१४-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यापूर्वी शिक्षकांनी केंद्र सरकारच्या नियमानुसार अन्नाचा दर्जा तपासणे व चव चाखणे आवश्यक आहे तसेच त्याच्या नोंदीही ठेवणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील प्रकरणी निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदा फाटा (जि.चंद्रपूर) येथील असन नाल्यावर पूल बांधण्याबाबत

**(२९) ७३१३४ (०४-०३-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदा फाटा (जि.चंद्रपूर) येथील गावाला लागून असलेल्या असन नाल्यावर पूल नसल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना पावसाळ्यात शेतावर जाताना मोठी अडचण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नाल्यावर पूलाचे बांधकाम करण्याची मागणी कित्येक वर्षांपासूनची असून त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या नाल्यावर तातडीने पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०४-२०२४) :** (१) होय
(२), (३) व (४) पूलाचे बांधकाम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## सांगली जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थी मोफत पाठयपुस्तकांपासून वंचित असल्याबाबत

**(३०) ७३२४४ (१४-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार मोफत पाठयपुस्तके देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयातील शाळांमध्ये शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके मिळालेली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्हयातील शाळांमध्ये तातडीने विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत सर्व शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच, शासन अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

सन २०२३-२४ समग्र शिक्षा अभियानांतर्गत सांगली जिल्हयातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठयपुस्तकांचे वितरण करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील नागरीक स्वस्त धान्यापासून वंचित असल्याबाबत**

**(३१) ७३८४० (२८-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेकडो रेशनकार्ड धारकांना मागील अनेक वर्षापासून स्वस्त धान्य दुकानातून मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव येथील सुमारे १००० रेशनकार्ड धारक हे नाशिक व धुळे येथील रेशनकार्ड धारकांच्या नावावर संलग्न केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित डाटा एन्ट्री ऑपरेटर तसेच संस्थेच्या चुकीमुळे मागील अनेक वर्षांपासून सदर रेशनकार्ड धारक धान्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२९-०४-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) खामगांव तालुक्यातील आधार क्रमांक नाशिक जिल्ह्यामध्ये लिंक झालेले होते. सदर बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांच्याकडून दि.११.०२.२०१९ रोजी टिम पाठवून लिंक असलेली काही आधार क्रमांक हे कमी करण्यात आले. याबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात आला. तसेच जिल्हा पुरवठा कार्यालय, नाशिक येथे लिंक असलेले एकूण १६८३ आधार क्रमांक कमी करण्यात आले आहेत. जे आधार क्रमांक नाशिक जिल्ह्यामधुन कमी करण्यात आले ते खामगांव तालुक्यामध्ये नोंद करून त्यांना धान्याचा लाभ देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमदार निवास व सार्वजनिक बांधकाम विभागामधील (पीडब्ल्यूडी) नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम अदाकणेबाबत**

**(३२) ७३८९९ (०५-०३-२०२४). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार निवास तसेच इतर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सन १९८६-१९८७ या कालावधीत रुजू झालेल्या श्री.सुर्यकांत इंगळे यांच्यासह एकूण ३८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही वेतन फरकाची रक्कम त्वरित देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन २०१८ मध्ये शासनाला आदेश दिलेले असतानाही सदर निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम आजमितीस देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायमूर्ती कालेलकर करारानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद पातळीवरील पाणीपुरवठा व बांधकाम विभागात सन १९६७ नंतर रोजंदारीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सलग पाच वर्षे सेवा झाल्यानंतर शासनाच्या कायम सेवेत घेण्याच्या तरतूदीनुसार या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्यात आले व या कर्मचाऱ्यांकडून श्रेणी-३ मधील कामे करुन घेण्यात येऊन वेतन मात्र चतुर्थ श्रेणीचे देण्यात आले, तत्कालीन सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सन १९९८ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार या कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या तारखेपासून मुद्द्यानुसार वेतनश्रेणी देणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन २०१८ मध्ये शासनाला आदेश देऊनही निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदर रक्कम देण्यास विलंब केलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

श्री.सुर्यकांत इंगळे यांच्यासह एकुण ३८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही वेतन फरकाची रक्कम त्वरीत देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन २०१८ मध्ये शासनाला आदेश दिलेले आढळुन येत नाही.
(२) हे खरे नाही.

श्री.शिवाजीराव नाईक, तत्कालिन मा.राज्यमंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने केलेल्या शिफारशी व वेळोवेळी कामगार प्रतिनिधींच्या शासनास प्राप्त झालेल्या विनंतीचा विचार करुन शासनाने मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.संकिर्ण-११९९/९०/भाग-४/सेवा-५, दिनांक २९.९.२००३ पारित केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार पात्र कर्मचाऱ्यांना कामानुसार हुददा व हुददयानुसार वेतन शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २९.९.२००३ पासून लागु करण्यात आलेले आहे. तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची थकबाकी देता येणार नाही, अशी तरतुद देखिल शासन निर्णयात केलेली असल्याने संबंधितांना वेतन फरकाची थकबाकी देण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महागांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथील कासोरा ते काळी दौ रस्त्यावरील संरक्षण भिंत अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याबाबत

**(३३) ७४०२६ (०४-०३-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथील कासोरा ते काळी दौ रस्त्यावरील रपटा तसेच संरक्षण भिंत दिनांक २१ व २२ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्त्यांची व संरक्षण भिंतीची दुरुस्ती करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०४-२०२४) :**(१) सदर रस्त्यावर प्रगतीत असलेले स्लॅब ड्रेन चे संरक्षण भिंतीचे काम अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झाले, हे खरे आहे.
(२) सदर कामाच्या करारनाम्याच्या तरतुदीनुसार संबंधित कंत्राटदाराकडून क्षतीग्रस्त झालेल्या संरक्षण भिंतीचे काम दुरुस्त करून घेण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत चालू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोरथ वाकोडी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पूस नदीवरील पुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(३४) ७४०२८ (०४-०३-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरथ वाकोडी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पूस नदीवरील पुलाच्या कामास चार वर्षांपूर्वी सुरुवात होऊनही अद्यापपर्यंत केवळ चार गाळयांचे बांधकाम पूर्ण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असतांना विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच या कामाचे दहा कोटी रुपयांचे अंदाजपत्रकत वाद होऊन ते १२ कोटी रुपयाचे आल्याचे निदर्शनास आल आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०४-२०२४) :**(१) सद्यस्थितीत पुलांचे ७ गाळयांचे स्लॅबचे काम पूर्ण झाले असून ८ व्या गाळ्याचे स्लॅबचे काम व पोचमार्गाचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) व (३) कोविड दरम्यान पूलाचे कामाचे भौतिक प्रगतीवर परिणाम झाला हे खरे आहे. मुदतवाढीमध्ये कंत्राटदार काम पूर्ण करू न शकल्याने सदर कंत्राटदारास रु.५०००/- प्रतिदिन याप्रमाणे काम पूर्ण होईपर्यंत दंड आकारण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यात कमी वजनाच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(३५) ७४०४८ (१४-०२-२०२४). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यात गॅस एजन्सी मार्फत कमी वजनाच्या गॅस सिलेंड चा पुरवठा होत असल्याने जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी अनेक गॅस एजन्सीच्या सिलेंड ची तपासणी केली असता कमी वजनाच्या गॅस सिलेंड चा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गॅस एजन्सी चालकांवर कारवाई करुन त्यांचे परवाने रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०३-२०२४) :**
(१) होय, हे खरे आहे.
दि.०५.१०.२०२३ रोजी मौजा राधाकृष्ण वार्ड, श्रीनगर, गोंदिया येथील ग्राहकांना वितरित करण्यात येत असलेल्या सिलिंडर ची तपासणी केली असता प्रमाणभूत वजन आढळून आलेले नाही.
(२) सदर अरविंदा एच.पी.गॅस एजन्सीच्या मालकाविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ कलम ३ व ७ अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त केलेल्या मुद्देमाल विल्हेवाटीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमगांव-देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील पालांदूर चुम्बली (चिलमटोला) रस्त्यावर चुम्बली नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(३६) ७४२१९ (०५-०३-२०२४). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव-देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील पालांदूर चुम्बली (चिलमटोला) रस्त्यावर चुम्बली नदीवर मोठ्या बुडीत पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन सदर पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक तो निधी वितरीत करुन बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०४-२०२४) :** (१) होय
(२) व (३) पूलाचे बांधकाम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**ठाणे जिल्ह्यातील शळांमध्ये शालेय पोषण आहार निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ७४८२८ (२८-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील सहा महानगरपालिका, जिल्हा परिषद, दोन नगरपरिषदा आदींच्या कार्यक्षेत्रातील सुमारे पाच लाख विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील २ हजार ६५९ शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या ५६४०७ विद्यार्थ्यांना पोषण आहार म्हणून खिचडी खायला देण्याकरीता तांदूळ व डाळीचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांचे कोट्यवधी रुपये गेल्या दीड वर्षापासून थकीत असल्याचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
ठाणे जिल्हयातील २,६५० शाळांमधील सुमारे ५,०४,२३४ इतक्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा लाभ देण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
संबंधित जिल्ह्यातील पुरवठेदार यांची माहे ऑक्टोबर-२०२२ ते नोव्हेंबर-२०२३ या कालावधीतील देयके जिल्हास्तरावरुन अदा करण्यात आलेली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहराती नवीन रेशनकार्ड काढण्याकरीता दलालांमार्फत लूट होत असल्याबाबत**

**(३८) ७५११७ (२५-०२-२०२४). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये नवीन रेशन कार्ड ऑनलाईन पध्दतीने काढण्यासाठी नि:शुल्क सेवा उपलब्ध करुन देण्यात आली असुनही तेथील नागरिकांची दलालांकडून (एजट) आर्थिक लूट होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील नागरिकांना नवीन रेशन कार्ड काढण्यासाठी ऑनलाईन सुविधा पुरविण्यात आलेली असतांना दलालांना (एजट) पैसे द्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दलालांवर (एजट) कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०३-२०२४) :** (१ ) व (२) हे खरे नाही.
(३) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय दि. १६.०५.२०२३ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत ई-शिधापत्रिका सुविधा निःशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानुसार शिधापत्रिकाधारकांना https://rcms.mahafood.gov.in// या वेबसाईटवर पब्लिक लॉगिनवर ऑनलाईन शिधापत्रिकेकरिता अर्ज करता येतो. ऑनलाईन ई-शिधापत्रिका कशी काढावी याबाबतच्या (SOP) कार्यपध्दतीचे फलक सर्व परिमंडळ कार्यालयामध्ये दर्शनी भागावर प्रदर्शित करणेत आले आहे. ऑनलाईन शिधापत्रिका उपरोक्त नमुद शासन निर्णयानुसार निःशुल्क दिली जाते व शिधापत्रिका कामकाज करणेकरिता शिधापत्रिकाधारकांकडून पैसे आकारले जात नाहीत. पुणे शहरात शिधापत्रिकेकरिता शुल्क आकारलेबाबत कोणतेही शिधापत्रिकाधारकांची तक्रार क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विरार पूर्व (ता.वसई जि.पालघर) येथे शालेय पोषण आहाराचे धान्य काळया बाजारात विकले जात असल्याबाबत

**(३९) ७५४३५ (२८-०२-२०२४). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार पूर्व (ता.वसई जि.पालघर) येथे शालेय पोषण आहाराचे धान्य मोठ्या प्रमाणात काळया बाजारात विकले जात असल्याप्रकरणी एका स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री,अन्न व नागरी पुरवठा मंत्री, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी तत्कालीन शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान त्रिसदस्यीय समिती नेमून कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-०३-२०२४) :**(१) अंशत: खरे आहे.

दि.१४ फेब्रुवारी, २०२० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच, दि.२० फेब्रुवारी, २०२० रोजी तत्कालिन मंत्री, शालेय शिक्षण यांना जिल्हाध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष, पालघर यांनी प्रस्तुत विषयाबाबत निवेदने दिली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद, पालघर यांनी दि.०६ ऑक्टोबर, २०२२

रोजीच्या आदेशान्वये त्रिस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. तसेच, सदर प्रकरणी विरार पोलीस स्टेशन क्र.गु.र.न.१५४/२० भा.द.वि.क ४०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून चौकशी सुरु आहे.

चौकशी समितीच्या अहवालानुसार अपहार झालेल्या तांदळाची रक्कम व्याजासहित रु.३५,०८९/- जिल्हा कार्यालयास भरणा करण्यात आली आहे. तसेच, संबंधित मुख्याध्यापक व शाळेवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, पालघर यांच्याद्वारे संबंधित संस्थेला आदेश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याचे मराठी भाषण संदर्भातील धोरण जाहीर करण्याबाबत**

**(४०) ७५५१६ (२५-०२-२०२४). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे मराठी भाषेसंदर्भातील पुढील २५ वर्षाचे धोरण ठरविण्यासाठी भाषा सल्लागार समितीने राज्य शासनास माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान धोरणाचा मसुदा सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोरणाचा मसुदा सादर करुन चार महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप शासनाने धोरण जाहीर केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे समिती सदस्यांकडून भाषा धोरण लवकरात लवकर जाहीर करण्यात यावे, अशी मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्याप राज्याचे धोरण जाहीर न करण्याची कारणे काय आहेत, तसेच मराठी भाषेचे धोरण जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०३-२०२४) :**

(१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांनी दि.०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत मराठी भाषा धोरण मसुदा शासनास सादर केला आहे. सदर धोरणातील शिफारसींचा अभ्यास करुन सदर शिफारसींसंदर्भात अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिनस्त कार्यालयांकडून उपसचिव, सचिव स्तरावरुन अभिप्राय मागविण्यात आले .

मराठी भाषा धोरणांसंबंधी दि.०८.११.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये भाषा सल्लागार समितीने ०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले धोरण हे विस्तृत स्वरुपाचे, क्लिष्ट असल्याने धोरणाचा मसुदा संक्षिप्त स्वरुपात व सर्वसामान्यांना समजेल अशा स्वरुपात समितीने सादर करावा असा निर्णय झाला. त्यास अनुसरुन अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांनी दि.२०.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषा धोरणाचा मसुदा संक्षिप्त स्वरुपात सादर केला आहे. सदर संक्षिप्त स्वरुपाच्या धोरणातील शिफारसींचे अवलोकन करुन धोरणातील शिफारसींसंदर्भात ज्या विभागांचे अभिप्राय प्राप्त झाले नाहीत, अशा संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात आला. मराठी भाषा धोरणाबाबत दि.२१.०२.२०२४ रोजी बैठक आयोजित करुन ज्या विभागांचे अभिप्राय अप्राप्त आहेत, अशा विभागांना तातडीने व सुस्पष्ट स्वरुपाचे अभिप्राय सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. धोरणाचा मसुदा अंतिम करुन मा.मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील (ता.राजुरा व कोरपना) रस्ते विकास कामामध्ये नाले, तलावातील मुरुम, रेती व दगडाचे कंत्राटदार कंपनी मान्यतेपेक्षा अधिक उत्खन्न करीत असल्याबाबत**

**(४१) ७५५९४ (०५-०३-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील (ता.राजूरा व कोरपना) रस्ते विकास कामामध्ये नाले, तलावातील मुरुम, रेती व दगडाचे उत्खनन कंत्राटदार कंपनी मान्यतेपेक्षा अधिक करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मान्यते पेक्षा अधिक उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०४-२०२४) : (**१) हे खरे नाही. सदर रस्ते विकास कामामध्ये वापरण्यात येत असलेले गौण खनिज कंत्राटदार आवश्यक परवाने प्राप्त करुनच वापरण्यात येत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्यात समग्र शिक्षा मोफत गणेवश योजनेमधून विद्यार्थ्यांना दोन गणवेश, बूट व पायमोजे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४२) ७५९३२ (२८-०२-२०२४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा मोफत गणवेश योजनेअंतर्गत सातारा जिल्हयातील मुली अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना दोन गणवेश दिले जात असून याशिवाय उर्वरित विद्यार्थ्यांना यावर्षी प्रथमच मोफत गणवेश योजनेतून दोन गणवेश, बूट व पायमोजे देण्याची घोषणा शासनाने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी रुपये ५ कोटी ६८ लाख मंजूर करण्यात आले असून अद्यापही उर्वरित विद्यार्थ्यांना दोन गणवेश, बूट व पायमोजे देण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित विद्यार्थ्यांना दोन गणवेश, बूट व पायमोजे त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-०३-२०२४) :**१) अंशत: खरे आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेमधून शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून इ.१ ली ते इ.८ वीच्या वर्गातील सर्व मुली, अनुसूचित जाती व जमातींची सर्व मुले आणि दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच, राज्य शासनाच्या मोफत गणवेश, बुट व पायमोजे योजनेंतर्गत उपरोक्त शाळांमधील दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या मुलांना दोन गणवेश तसेच मोफत गणवेश योजनेंतर्गत सर्व पात्र विद्यार्थ्यांना एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय दि.०६ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

सातारा जिल्हयातील विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश, बुट व पायमोजे योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी रु.१०,७६,२१,९९०/- इतके अनुदान देण्यात आले होते. सदर अनुदानातून सन २०२३-२४ च्या पटसंख्येनुसार विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई पुर्वेकडून जाणाऱ्या राज्यमार्ग क्रमांक ८१ वरील मुंबई-अहमदाबाद महामार्गाची रुंदी वाढविण्याबाबत

**(४३) ७६००७ (०५-०३-२०२४). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई पूर्वेकडून जाणाऱ्या राज्यमार्ग क्रमांक ८१ वरील मुंबई-अहमदाबाद महामार्गापासून जाणाऱ्या शिरसाड-अंबाड मार्गावरील अरुंद आणि दुहेरी वाहतूक असलेल्या मार्गाची रुंदी वाढविण्याबाबत तसेच दुभाजक टाकून येणाऱ्या-जाणाऱ्या दोन वाहिन्यांचा मार्ग तयार करुन जीवघेण्या प्रवासापासून सुटका करण्याबाबतची मागणी वाहन चालक व प्रवाशांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, तद्नुषंगाने पाहणीमध्ये काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर मार्गावरील अपघात रोखण्याकरिता त्या मार्गाची रुंदी वाढविणे व दुभाजक टाकणेसाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०४-२०२४) :**

(१) निवेदन प्राप्त नाही.

(२), (३) व (४) वसईच्या पूर्वेकडून जाणाऱ्या राज्यमार्ग क्रमांक ८१ वरील मार्गाची रुंदी वाढविण्याबाबतचे काम प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेतील शिक्षणाधिकारी पद भरणेबाबत

**(४४) ७६२१७ (२९-०२-२०२४). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेला १२ वर्षानंतरही शिक्षणाधिकारी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेला शिक्षणाधिकारी नसल्याने १ लाख ५२ हजार विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेच्या शिक्षणाचा स्तर दिवसेंदिवस कमी होत शिक्षणाधिकारी पद भरण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शिक्षणाधिकारी पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-०३-२०२४) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत सरळसेवेने पदभरती तसेच पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील स्वातंत्र्यवीर सावरकर वसतीगृह विद्यार्थ्यांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) ७६२९० (२९-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलीना कॅम्पसमधील स्वातंत्र्यवीर सावरकर आंतर राष्ट्रीय वसतीगृहाचे उद्घाटन मागील वर्षी पार पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षाचा कालावधी होऊनही हे वसतीगृह विद्यार्थ्यांना निवासासाठी व विद्यार्थ्यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही, यासाठी सदर वसतीगृह सुरु होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसतीगृह निवासासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०३-२०२४) :**

(१) होय, हे खरे आहे.

मुलांच्या आंतरराष्ट्रीय वसतीगृहाचे उद्घाटन पार पडले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वसतीगृहासाठी फर्निचरची निविदा पार पडली असून, कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु असून, सदरहू प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. तसेच वसतीगृह सुरु करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी (पूर्व) कार्यालय येथे स्थलांतरीत करण्यात आलेल्या शिधावाटप कार्यालयास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) ७७१२२ (२५-०२-२०२४). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) एम.आय.डी.सी येथील एम.टी.एन एल कार्यालय येथे स्थलांतरीत करण्यात आलेल्या २६-ड शिधावाटप कार्यालयास अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिधावाटप कार्यालय स्थलांतरण होऊन ३ ते ४ वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप शिधावाटप कार्यालयास हक्काची जागा उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिधावाटप कार्यालयास तातडीने जागा व निधी उपलब्ध होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा होवूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शिधावाटप कार्यालयास जागा व निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२२-०३-२०२४) :**

(१) हे खरे आहे

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

शिधावाटप कार्यालय क्र.२६/ड या कार्यालयास शासकीय जागा उपलब्ध होण्याकरीता प्रयत्न करण्यात आले असून, काही जागा अन्य आस्थापनेस मान्य झाल्याने, तर काहीचे क्षेत्रफळ कमी असल्याने, अथवा उपलब्ध नसल्याने जागा उपलब्ध झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील धान खरेदी केंद्र सुरु करणेबाबत

**(४७) ७७२९२ (२५-०२-२०२४). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील धान खरेदी केंद्र बंद असल्याने शेतकरी अडचणीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धान खरेदी केंद्र सुरु होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२२-०३-२०२४) :** (१) व (२) पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील धान खरेदी केंद्र दिनाक १७/१०/२०२३ रोजीच निश्चित केलेले असून तेथे १५८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यामुळे पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील धान खरेदी केंद्र बंद असल्याने शेतकरी अडचणीत आहेत हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील विद्यार्थ्यासाठी एका विशिष्ट दुकानदाराकडूनच गणवेश खरेदी करण्यासाठी शिक्षण विभागाने परिपत्रक काढल्याबाबत

**(४८) ७७६२९ (२८-०२-२०२४). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील १८९ शाळांतील इयत्ता १ ते ८ वी तील मिळून ५ हजार १५६ इतकी विद्यार्थी संख्या असून शासनाने सन २०२३-२४ साठी वसमत तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीकरिता रुपये ११ कोटी ३९ लाख ४९ हजार इतका निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांनी हे गणवेश पुर्णा येथून एका विशिष्ट दुकानदारांकडून खरेदी करावेत व त्यास शिक्षण समितीने संमती द्यावी, असे पत्रक शिक्षण विभागाने काढले असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विशिष्ट एका दुकानदाराकडूनच गणवेश खरेदी करण्याच्या शासनाच्या सदर पत्रकामुळे, शालेय समितीचे जे अधिकार आहेत ते जात असून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार गणवेश खरेदी झाला पाहिजे त्यासाठी स्वतंत्ररित्या त्या त्या पध्दतीने गणवेश खरेदी करण्याचे शाळा समित्यांनी निश्चित करुन शिक्षण विभागाच्या परिपत्रकास विरोध दर्शविला असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२३-२०२४ साठी शालेय गणवेश खरेदी केले जात असून गणवेश खरेदीचा अधिकार ज्या-त्या शाळा मुख्याध्यापक व शालेय समितीचा आहे व त्यांच्यावर गणवेश खरेदीसाठी कोणीही कसलाही दबाव टाक्त नाही", असे गट शिक्षणाधिकारी, वसमत यांनी सांगितले आहे, तर दुसरीकडे पुर्णा येथुनच शालेय गणवेश विशिष्ट एका दुकानातून खरेदी करावेत असे शिक्षण विभागाने परिपत्रक काढले आहे त्यामुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे शासनाने याबाबत चौकशी करुन समन्वय साधण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील १८९ शाळांतील इ.१ ली ते ८ वी मधील एकूण २२,९७५ लाभार्थी आहेत. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात समग्र शिक्षा अभियानांतर्गत व राज्य शासनाच्या मोफत गणवेश, बुट व पायमोजे योजनेंतर्गत सदर विद्यार्थ्यांना दोन गणवेश, एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे उपलब्ध करुन देण्याकरिता रु.१,७६,९०,७५०/- इतका निधी वर्ग करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी प्रस्तुत योजनेचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचे सर्व संबंधितांना निर्देश दिले आहेत.

पूर्णा येथून शालेय गणवेश विशिष्ट एका दुकानातुन खरेदी करावेत असे कोणतेही लेखी स्वरुपातील पत्रक शिक्षण विभागाने काढलेले नाही. तसेच, याबाबत कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, हिंगोली या कार्यालयास प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा मिळण्याबाबत

**(४९) ७८३४१ (२५-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्र रेषेखालील कुटुंबांना सण उत्सवात गोडधोड खाता यावे, यासाठी शासनातर्फे आनंदाचा शिधा संच वितरित करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या संख्येनुसार शासनाकडून नियतन प्राप्त झाले नसून अनेकांना याचा लाभ मिळाला नाही व अनेक गावांमध्ये शिधा संच अपुरे पडले असून या संचामध्ये विविध वस्तू मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना शिधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२९-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सांगली जिल्ह्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अंत्योदय योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांकरीता ४०६७६० इतक्या शिधाजिन्नसंचांचा पुरवठादाराने पुरवठा केला असून, दि.३१.११.२०२३ रोजी अखेर ३९७१७० (९७.६४%) इतक्या आनंदाचा शिधा संचांचा रास्तभाव दुकानदार यांचेमार्फत वितरीत करण्यात आले होते. तसेच, शासनाच्या प्रथम मागणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First Come, First served) या तत्वानुसार उपलब्ध लाभार्थी यांना शिल्लक आनंदाचा शिधा संचांचे वितरण करून १००% आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली यांचे अहवालानुसार सांगली जिल्ह्यात पात्र शिधापत्रिकाधारकास कमी शिधा प्राप्त झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील निजामकालीन पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(५०) ७८८५१ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील टी.बी. गिरवलकर, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रस्त्यावरील निजामकालीन पुलाच्या कामाला शासनाने नाबार्ड अंतर्गत मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुरी दिलेल्या पुलाचे काम रद्द करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुल अत्यंत निकृष्ट दर्जाचा झाल्याने पुलाच्या दुरुस्तीबाबतची मागणी नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निजामकालीन पुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून किती रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला वा देण्यात येणार आहे, तसेच पुल दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (११-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.